3/1

# जॉन स्टुअर्ट मील (1806 ते 1873)

1) प्रस्तावना :- जॉन स्टुअर्ट मील हा ब्रिटीश विचारवंत आहे. उपयुक्ततावादाच्या विचार मांडणारा शेवटचा समर्थक आणि व्यक्तीवादाच्या विचार मांडणारा आग्रणीय विचारवंत आहे. तसेच स्वातंत्र्याच्या, लोकशाहीच्या, उदारमतवादाचा पुरस्कारही त्यांनी केला आहे. त्याचा जन्म 20 मे 1806 मध्ये झाला. त्याचे वडील जेम्स मील हे बेंथमचे मित्र व शिष्य होते. तसेच एक प्रसिद्ध इतिहासकार, उपयुक्ततावादी विचारवंतही होते. 1820 मध्ये तो फ्रान्सला गेला. तेथे फ्रेंच उपन्यासकार, नाटककार फ्रान्डला मार्मोतेल यांचे 'संस्मरण' हे पुस्तक वाचून त्यांच्या जिवनामध्ये आमुलाग्र परिवर्तन झाले. तसेच दुसरी एक महत्वाची घटना म्हणजे वयाच्या 25 व्या वर्षी मिलचा परिचय श्रीमती हेरीयन टेलर या महिलेशी झाला 1851 मध्ये श्री. टेलरच्या मृत्यूनंतर मीलने श्रीमती टेलरशी विवाह

केला. श्रीमती टेलरचा प्रभाव मीलवर खूप पडला. 1866 मध्ये तो ब्रिटिश पार्लमेंटचा सदस्य बनला व शेवटी 8 मे 1873 रोजी त्याचा मृत्यू झाला.

[2] ग्रंथरचना :- मीलने काव्यशास्त्र, नितीशास्त्र, तर्कशास्त्र, अर्थशास्त्र इ. अनेक विषयावर लेखन केले आहे. त्यामध्ये (1) राज्यशास्त्राच्या दृष्टीने स्वातंत्र्याविषयी (2) उपयुक्ततावाद हे दोन ग्रंथ महत्वाचे आहेत.

[3] प्रभाव :- 1) जेम्स मील व बेंथमचा प्रभाव

2) फ्रान्समधील वास्तव्याचा प्रभाव :-

3) श्रीमती टेलरचा प्रभाव :-

4) कवी वर्ड्सवर्थ, कॉलरीज, गेटे इ. प्रभाव :-

5) प्लेटो, हेरोडोटस, जेनोफन, थ्युसिडायडस इ. विचारवंतांचा प्रभाव

[4] अध्ययन पद्धत :- ऐतिहासिक अध्ययन पद्धत, निगमनात्मक, आगमनात्मक, अनुभवात्मक अध्ययन पद्धतीचा स्वीकार मीलनी केला आहे.

[5] मीलचा उपयुक्ततावाद :-

1) प्रस्तावना :-

2) मीलचा उपयुक्ततावाद :- मीलने आपल्या उपयुक्ततावाद या ग्रंथामध्ये उपयुक्ततावादाचा विचार मांडला आहे. त्याच्यावर जेम्स मील व उपयुक्ततावादाचा जनक म्हणून ज्या बेंथमचा विचार केला जातो त्याचाही प्रभाव मीलवर पडला आहे परंतू मीलनी बेंथमचा उपयुक्ततावाद जसाच्या तसा स्विकारला नाही तर त्याच्या विचारामध्ये परिवर्तन करुन वेगळा विचार मांडला आहे.

जे. एस. मीलच्या या विचाराचा विचार करण्या आगोदर बेंथमच्या विचाराची कल्पना स्पष्ट करणे

आवश्यक आहे

(3) बेंथमचा उपयुक्ततावाद :-

(1) सुखदुःख मोजता येते असे बेंथमचे मत आहे

(2) मानवी जीवनात सुख योग्य व दुःख वाईट असते.

(3) सुखदुःखामध्ये मात्रात्मक फरक मानतो गुणात्मक फरक नाही

(4) जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त कल्याण.

(5) कोणतेही वस्तू वाईट नसते वाईट असते ती उपयुक्तता

(6) बेंथमचा उपयुक्ततावाद भौतिकतेवर आधारलेला आहे

(7) बेंथमच्या मते कायद्याचा आधार उपयुक्तता हेच आहे

(8) बेंथमचा सुखाचा विचार वास्तव स्वरुपाचा आहे. इ.

वरीलप्रमाणे बेंथमनी सुखदुःखाच्या बाबतीमध्ये आपले मत मांडले आहे. त्या पुर्ण विचारामध्ये जे.एस. मीलनी संशोधन केले आहे

(4) मीलचा उपयुक्ततावाद | संशोधन :- जे.एस. मीलनी बेंथमच्या उपयुक्ततावादी विचारात खालीलप्रमाणे संशोधन केले आहे.

(1) सुखामध्ये मात्रात्मक व गुणात्मक अंतर आहे :-

(2) सुखदुःखाचे मोजमाप करता येत नाही :-

(3) उपयुक्ततावादाचा आधार नैतिकता :-

(4) कायद्यापेक्षा नैतिक व सामाजिक बंधने मोठे :- कायद्यापेक्षा नैतिक व सामाजिक बंधने मोठे आहेत असे मीलचे मत आहे परंतू बेंथमनी मात्र उपयुक्तता हा कायद्याचा आधार मानला आहे. उपयुक्ततेची निश्चित मापयंत्रे नसल्यामुळे उपयुक्तता हा कायद्याचा आधार होवू शकत नाही असे मीलचे मत आहे. मीलनी सुखवस्था, नैतिकता हाच कायद्याचा आधार मानलेला नाही. नैतिकतेमुळे निःस्वार्थी वागणारी व्यक्ती समा-

ज्ञात व्यक्ती आनंदाने करील आपल्या उपयोगिता हा
एकच निकष सर्वत्र लावणे गैर असते. उदा - आई-वडिलांची
सेवा करणे, गुरुजनांचा आदर करणे व त्यांचा सन्मान करा.
यदयाच्या आधार जनतेची सत्ता आहे असे मिल मानतो.

(5) सुख ही बाह्य नसून आंतरिक प्रेरणा आहे :- बेंथ-
म ही सुखप्राप्तीसाठी सामाजिक, राजकीय, धार्मिक,
नैसर्गिक व बाह्य कारणांच्या विचार मांडला आहे. परंतु
मीलनी या बाह्य कारणांबरोबर अंतःकरणाच्या नरवावरही
भर दिला आहे. मिलच्या मते सुख हे नैतिक, सामाजिक,
मानसिक व आध्यात्मिकही असू शकते. राष्ट्रभक्तीचे
सुख हे आंतरिक आहे. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी बलिदान दे-
णाऱ्या शूरवीरांचे सुख हे ही आंतरिकच आहे. भगतसिंग,
फाशीवर मरण असतानादेखील हसत होता ते बाह्य
सुखामुळे नव्हे (येशू ख्रिस्त, सॉक्रेटिस यांनीही आंतरिक
सुखासाठीच आपल्या जीवाची आहुती दिली आहे)

(6) व्यक्ती स्वातंत्र्यासंबंधी विचार :- बेंथमनी व्यक्ती
स्वातंत्र्याला उपयोगिता सिद्धांताचे साधन मानले
तर मिलनी साध्य मानले आहे. बेंथमनी असे मत मां-
डले की, राज्याने केवळ नकारात्मक कार्य करावे व्य-
क्तीच्या कार्यामध्ये हस्तक्षेप करू नये परंतु मील-
नी आर्थिक क्षेत्रातही राज्याच्या हस्तक्षेप मान्य केला
आहे.

(7) प्रत्येक सुखप्राप्तीची आवश्यकता नसते :-
बेंथमच्या मते प्रत्येक व्यक्ती आपल्या सुखा-
च्या शोधात असतो असे मत मांडले आहे. परंतु मिल-
नी पावलोपावली दुसऱ्याच्या सुखामध्येही त्याचे सुख
सामावलेले असते. मीलने सार्वजनिक सुखाची

Scanned with CamScanner

सुख होय असते. उदा. पुस्तकी, परोपकार, सहानुभूती या मध्ये ही सुख मानते. स्वतः मृत्यूच्या दारात असलेल्या दुसऱ्याच्या जीव वाचवण्यातही आनंद मानतो.
अशाप्रकारे मीलनी ग्रंथामध्ये विचारात सांगितले आपला विचार मांडला आहे.

IMP 20 mark

☆ जे. एस. मीलच्या स्वातंत्र्यासंबंधीचा विचार
(1) प्रस्तावना
(2) मीलच्या स्वातंत्र्यासंबंधीचा विचार :- जे. एस. मीलने आपल्या 'ऑन लिबर्टी' या ग्रंथामध्ये स्वातंत्र्यासंबंधीचा विचार मांडला आहे या ग्रंथाबाबत वेपर हा विचारवंत असे मत व्यक्त करतो की, "विचार व अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करणारा एवढा चांगला ग्रंथ यापुर्वी लिहीला गेला नव्हता" असा अभिप्राय त्यांनी व्यक्त केला आहे.
जे. एस. मील हा ब्रिटिश विचारवंत असून त्यावेळी इंग्लंडमध्ये सुधारणा आंदोलन सुरु होते. उपयुक्ततेच्या प्रभावामुळे संसद वेगवेगळे कायदे बनवत होती. सामाजिक व्यवस्थेच्या नावाखाली व्यक्तीस्वातंत्र्यात हस्तक्षेप होवू लागला. यामुळे प्रजातंत्राच शोषण येईल व शासन पुन्हा स्वेच्छाचारी बनेल ही भिती त्याला वाटत होती. अधिकतम लोकांचे अधिकतम सुख यामुळे राज्याचे कार्यक्षेत्र वाढत होते या कारणासाठीच मीलने व्यक्तीस्वातंत्र्यावर प्रतिबंध घालणाऱ्या कायद्याला विरोध केला.
व्यक्तीच्या विकासामध्ये समाज व राज्याकडून अडथळे निर्माण होतात. या अडथळे दुर करणारी

शकतो म्हणजे स्वातंत्र्य होय) आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे रोजगार नव्हे. तर त्या व्यक्तीवर मर्यादा आवश्यक आहेत. परंतु त्या मर्यादा मर्यादितच असाव्या.

मीलच्या मते व्यक्तीचे हित व्यक्तीलाच अधिक कळते समाजाला नव्हे. व्यक्तीच्या विकासासाठी तिला कार्याचे व विचाराचे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. राज्याने किंवा समाजाने व्यक्तीच्या आचरणावर प्रतिबंध घालू नये. जर व्यक्तीच्या आचरणाचा परिणाम दुसऱ्यावर होत असेल तर, समाजाने किंवा राज्याने तिच्या हस्तक्षेप मान्य करता येईल. असे मिलचे मत आहे.

③ स्वातंत्र्याचे प्रकार :— जे.एस. मीलच्या मते स्वातंत्र्याचे दोन प्रकार आहेत. ① विचार / अभिव्यक्ती स्वातंत्र्य ② आचार / कार्यसंबंधी स्वातंत्र्य

① विचार / अभिव्यक्ती स्वातंत्र्य :— मीलच्या मते समाजातील प्रत्येक व्यक्तीला विचार व भाषण स्वातंत्र्य देणे आवश्यक आहे. या विचार किंवा भाषण स्वातंत्र्यावर समाजाचे किंवा राज्याचे बंधन असू नये. अमर्याद स्वरूपाचे हे स्वातंत्र्य देण्यात यावे. विचार स्वातंत्र्याशिवाय सत्याचा शोध होणार नाही. विचारावर प्रतिबंध घालणे म्हणजे सत्यावर प्रतिबंध घालण्यासारखे आहे. व्यक्तीचे मत किंवा विचार सत्य, असत्य, अर्धसत्य, अर्धअसत्य, समाजाच्या अनुकूल, समाजाच्या प्रतिकूल अशा कोणत्याही प्रकारचे असू शकते. मिलच्या मते कोणत्याही प्रकारचा विचार असला तरी तो ~~दाबून~~ ~~दाबून~~ ~~शकू~~ टाकू नये संपूर्ण समाजाचे मत एकीकडे आणि एका व्यक्तीचे मत एकीकडे असेल तरी त्या एका व्यक्तीला आपले मत विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य असावयास हवे

Scanned with CamScanner

તત્વની વ્યક્તી એ શાસની આવો, મુર્ખ આવો નિશ્ચય રાજાએ કિંવા સમાજાને બંધને ઘાલૂ નયેત

મિલને વિચાર સ્વાતંત્ર્યાચી કિંવા અભિવ્યક્ત સ્વાતંત્ર્યાચી ગરજ ખાલીલ કારણામુળે સાંગિતલી આહે

(1) સમાજાચ્યા કલ્યાણાસાઠી વિચાર સ્વાતંત્ર્યાચી આવશ્યકતા આહે

(2) પરિવર્તનાસાઠી :-

(3) અન્યાય દૂર કરણ્યાસાઠી :-

(4) સત્ય સમજણ્યાસાઠી :-

(5) સત્યાલા ઉજાળા દેણ્યાસાઠી :-

(6) વ્યક્તી, સમાજ, રાષ્ટ્રાચ્યા વિકાસાસાઠી :-

(7) વિકાસામધ્યે સાતત્ય ઠેવણ્યાસાઠી વિચાર સ્વાતંત્ર્યાચી આવશ્યકતા આહે. અસે મિલચે મત આહે.

(2) આચાર સ્વાતંત્ર્ય | કૃતી સ્વાતંત્ર્ય | કાર્ય સ્વાતંત્ર્ય

મિલચ્યા મતે સ્વાતંત્ર્યાચી દુસરી બાજૂ મ્હણજે આચાર કિંવા કૃતી કરણ્યાચે સ્વાતંત્ર્ય હોય. કૃતીસ્વાતંત્ર્યાશિવાય વિચાર સ્વાતંત્ર્યાલા અર્થચ ઉરત નાહી. વિચાર વ કૃતીસ્વાતંત્ર્ય હે પરસ્પરાંના પુરક આહેત. કેવળ દુસર્યાચ્યા મતાંને વ્યક્તી કાર્ય કરીત રાહિલા તર ગુલામ વ વ્યક્તી યામધ્યે કાહીચ ફરક રાહણાર નાહી.

મિલને અમર્યાદ સ્વાતંત્ર્યાચા પુરસ્કાર કેલા આહે તરી આચાર સ્વાતંત્ર્યાવર કાહી પ્રમાણાત મર્યાદા ઘાતલ્યા. મિલને આચાર સ્વાતંત્ર્યાલા

किंवा कृती स्वातंत्र्याचे दोन प्रकार सांगितले आहेत

1) व्यक्तिगत किंवा स्वसंबंधी कार्य
2) सामाजिक किंवा परसंबंधी कार्य

हे कार्याचे दोन भाग आहेत असे मीलचे मत आहे.

(1) व्यक्तिगत किंवा स्वसंबंधी कार्य :-

व्यक्तीच्या ज्या कार्याचा परिणाम तीच्या स्वतः पुरता मर्यादित असतो. इतरांवर त्याचा काहि प्रभाव पडत नाही त्या कार्याना स्वसंबंधी कार्य असे म्हणतात. उदा - खाणे, पिणे, कपडे वापरणे, जुगार खेळणे, दारू पीणे, सिगारेट ओढणे इ.

मीलच्या मते स्वसंबंधी कार्य व्यक्तीला तीच्या इच्छेनुसार करण्याचे पुर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे शासनाने त्या कार्यामध्ये हस्तक्षेप करू नये. असे स्वातंत्र्य नाकारणे म्हणजेच व्यक्तीला पशु बनविण्यासारखे आहे. असे मीलचे मत आहे.

(2) सामाजिक किंवा परसंबंधी कार्य :-

व्यक्तीच्या ज्या कार्याचा परिणाम इतरांवर पडतो. त्या कार्याना (सामाजिक) परसंबंधी कार्य असे म्हणतात. जर एखाद्या व्यक्तीच्या कार्याचे समाजावर काहि परिणाम होत असेल तर त्या व्यक्तीच्या कार्यामध्ये हस्तक्षेप केला जावू शकेल. समाजामध्ये अशांतता,

Scanned with CamScanner

अराजकता निर्माण होईल असे कार्य करण्याचा किंवा
कायदा, सुव्यवस्था धोक्यात येईल असे वागण्याचा
अधिकार समाजातील नागरिकांना नाही. एखादा व्य-
क्ती दारू पिऊन घरामध्ये शांत झोपत असेल तर
त्याला तो अधिकार देणे आवश्यक आहे. आणि तोच
जर आपल्या पत्नीला मारत असेल, घरामध्ये गोंध-
ळ घालत असेल किंवा सार्वजनिक किंवा शासकीय
पद भुषवित असेल तर त्यावर बंधने घालणे आ-
वश्यक आहे

थोडक्यात मिलची स्वातंत्र्याची कल्पना
अमर्याद नाही. मिलच्या मते, स्वातंत्र्याच्या मर्या-
दा किंवा बंधने खालीलप्रमाणे सांगता येतील-

(1) परसंबंधी कार्यामुळे समाजाचे अहित होत असेल तर
त्यावर मर्यादा टाकावी.

(2) व्यक्ती जर स्वतःचे अहित करुन घेत असेल तर
त्या कार्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार शासनाला
असतो. उदा- आत्महत्या करण्याचा अधिकार व्य-
क्तीला नाही, कारण त्यातून स्वतःचे अहित होते.

(3) मागासलेल्या, असभ्य, असंस्कृत, अविकसित लोकांना
आधार स्वातंत्र्य देणे अयोग्य आहे. कारण ते स्वातं-
त्र्याचा सदुपयोग करण्याइतपत ज्ञानी नसतात. असे
मिलचे मत आहे.

थोडक्यात मिलच्या स्वातंत्र्याच्या कल्प-
नेत पुढील तत्वे/ लक्षणे आढळतात.

वैशिष्ट्ये :-

(1) मिलने व्यक्तीच्या भावना व इच्छांना महत्त्व

Scanned with CamScanner

देऊन व्यक्तीगत कायदेत स्वातंत्र्याचे समर्थन केले
(३) विवेकहेतवादी भावनेला अधिक महत्व दिले.
(४) उत्स्फुर्तता व व्यक्तीमत्व या दोन गोष्टी व्यक्तीविकास व समाजकल्याणाचे आवश्यक घटक मानले.
(5) स्वातंत्र्य समाजाच्या विकासासाठी आवश्यक आसते.
(5) सामाजिक परंपरा, रुढीवादाला तो विरोध करतो.
(6) स्वातंत्र्य आणि लोकतंत्र तो एकच समजतो
(7) परसंबंधी कायदे राज्याच्या हस्तक्षेपाचे समर्थन करतो.
(8) अविकसित, असंस्कृत, मागासलेल्या लोकांना स्वातंत्र्यापासून दूर ठेवतो.

क. तत्वे मिलच्या या विचारामध्ये दिसून येतात.

☆ स्वातंत्र्यासंबधीच्या विचारातील दोष/टि

(1) स्वातंत्र्याची नकारात्मक कल्पना :- मीलच्या मते, "स्वातंत्र्य म्हणजे बंधनाचा अभाव होय." स्वातंत्र्याचा हा अर्थ पुर्णतः नकारात्मक आहे राज्याने केवळ मानवी विकासाच्या मार्गात येणाऱ्या अडचणी दूर करावयात आहे मीलचे मत आहे. परंतू राज्याला सकारात्मक कार्य केल्याशिवाय खरे स्वातंत्र्य उपलब्ध होणे कठीण वाटते.

(2) हक्काकडे दुर्लक्ष :- मीलने स्वातंत्र्याचे महत्व आणि आवश्यकता यासोबत

वर्णन केले आहे परंतु स्वातंत्र्याच्या संरक्षणाचे प्रभावी मार्ग किंवा उपाय सांगितले नाहीत. तसेच महिलांना कडेही दुर्लक्ष केले आहे. अधिकारांशिवाय स्वातंत्र्याची कल्पना असंभव आहे. बार्कर्नी असे मत मांडले आहे की, "मी मिलला स्वातंत्र्याचे आणि आधुनिक व्यक्तिचे समर्थन करणारा पैगंबर आहे." अशी टिका त्यांनी केलेली आहे कारण त्यामध्ये समाजाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे

(3) स्वातंत्र्याची विभागणी अनावश्यक व असंभव:- मीलने स्वातंत्र्याचे स्व-संबंधी व परसंबंधी कार्यात विभागणी केली आहे परंतु प्रत्यक्ष व्यवहाराच्या / वागण्याच्या विचार करता अशाप्रकारची विभाजन रेषा ओढली जाऊ शकत नाही असे टिकाकारांचे मत आहे

(4) राज्याच्या हस्तक्षेपाची शक्यता:- मीलने परसंबंधी कार्यामध्ये राज्याच्या हस्तक्षेपाला मान्यता दिली आहे. या मान्यतेमुळे व्यक्तीच्या प्रत्येक परसंबंधी कार्यामध्ये राज्य हस्तक्षेप करु शकेल असे टिकाकारांचे मत आहे

(5) श्रमिकांची / मागासलेल्यांची उपेक्षा:- मीलच्या या विचारातील सर्वात मोठा दोष म्हणजे तो मागास जातींना, श्रमिकांना, असंस्कृत व अज्ञानी लोकांना स्वातंत्र्यासाठी योग्य समजत नाही. एकीकडे प्रगतीशील उपयुक्ततावादी, व्यक्ती स्वातंत्र्यवादी विचारांचे समर्थन करणारा मील दुसरीकडे श्रमिकांना स्वातंत्र्यापासून वंचित ठेवतो

ही त्यांच्या विचारातील विसंगतीच आहे.

अशाप्रकारे मीलच्या विचारामध्ये वरील प्रकारचे दोष दिसून येतात. तरी परंतू त्यांचा हा विचार अत्यंत महत्वाचा आहे कारण आज जगातील अनेक देशांच्या संविधानांनी स्वातंत्र्याचे समर्थन केले आहे त्याचे सर्व श्रेय मीललाच जाते. मीलचे स्वातंत्र्यासंबंधीचे विचार म्हणजे राज्यशास्त्राला दिलेली एक अमुल्य देणगीच आहे असे आपणास म्हणता येईल.

IMP

★ मीलचे प्रातिनिधीक लोकशाहीसंबंधीचे विचार :-

(1) प्रस्तावना :-

(2) प्रातिनिधीक शासनप्रणालीविषयीचा विचार

मीलने लोकशाही शासनप्रणालीचे समर्थन केले आहे. इंग्लंडमध्ये असलेल्या प्रातिनिधीक शासनप्रणालीमध्ये अनेक दोष होते ते दूर करण्यासाठीच मीलने रिप्रेझेंटेटिव्ह गव्हर्मेंट । प्रातिनिधीक शासन हा ग्रंथ लिहून अनेक सुधारणा सुचविल्या आहेत. या ग्रंथात प्रातिनिधीक शासनप्रणालीतील दोष किंवा उणिवा सांगून ते दूर करण्यासाठी काही उपायही सुचविले आहेत.

मीलच्या मते ज्या शासनप्रणालीमध्ये पुढील गोष्टी साध्य केल्या जातात ती शासनप्रणाली चांगली आहे

१) ज्या शासनप्रणालीमध्ये नागरीकांच्या बुद्धीचा व गुणांचा विकास होतो.

२) ~~नैतिक~~ नागरीकामध्ये नैतिक व मानसिक गुणांचा विकास होतो.

३) चारित्र्य निर्मितीकडे लक्ष देणे.

४) नागरिकांना अधिकार व कर्तव्याची जाणीव असणे.

ही तत्वे ज्या शासनव्यवस्थेत आचरणात तीच सर्वोत्तम होय. राजतंत्र, कुलीनतंत्रामध्ये ही तत्वे लागू शकत नाहीत. ती फक्त लोकशाहीमध्येच लागू शकतात असे मीलचे मत आहे.

मीलने प्रत्यक्ष लोकशाहीऐवजी अप्रत्यक्ष लोकशाहीचे समर्थन केले आहे. प्रतिनिधीक शासनामध्ये मीलने पुढीलप्रमाणे सुधारणा सुचविली आहे

(१) अल्पसंख्याकांना प्रतिनिधीत्व देणे :- प्रतिनिधीक किंवा अप्रत्यक्ष शासनप्रणालीत अल्पसंख्याकांच्या मताकडे दुर्लक्ष होते व बहुसंख्याकांकडे लक्ष दिले जाते बहुसंख्याकांनी घेतलेला निर्णय अल्पसंख्याकांना मानावा लागतो हे मीलला मान्य नाही. हा दोष दूर करण्यासाठी तो अल्पसंख्याकांना प्रतिनिधीत्व देणे मान्य करतो अल्पमतवाल्यांचे म्हणजेच निवडणूकीत कमी मते मिळणाऱ्यांचे विधीमंडळात प्रतिनिधीत्व असावे आणि त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे. अल्पसंख्याकांच्या हितांचे रक्षण करण्यासाठी प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाची संकल्पना / अल्पसंख्याकांना प्रति

निश्चित देण्याची कल्पना तो सुचवितो.

(२) मतदारांची योग्यता :- मीलच्या मते मतदारांची शैक्षणिक योग्यता असणे आवश्यक आहे. जे लोक बुद्धीमान, शिक्षित, राजकीयदृष्ट्या जागृत असतील त्यांना लिहिता वाचता येते, ज्यांना गणिताचे ज्ञान आहे अशांनाच मतदानाचा अधिकार देण्यात यावा. शैक्षणिक योग्यतेप्रमाणेच मतदारांसाठी तो ~~आर्थिक~~ संपत्तीची योग्यताही आवश्यक मानतो. जे लोक शासनाचा कर भरतात त्यांनाच मतदानाचा अधिकार असावा. भिकारी व्यक्तींना मतदानाचा अधिकार असू नये असे मीलचे मत आहे.

(३) एकापेक्षा अधिक मते :- लोकशाहीमध्ये सर्वांना सारखे मानले जाते. योग्यता, बुद्धीमत्ता, शिक्षण यामध्ये भेद केला जात नाही. ज्ञानी, अज्ञानी या सर्वांच्या मताची किंमत सारखीच असते. केवळ संख्येला महत्व असते. गुणाला, बुद्धीला काहीच किंमत राहत नाही. मीलने याला विरोध केला आहे. मीलने मुर्ख व विद्वान यामध्ये फरक करून विद्वानांना एकापेक्षा अधिक मते देण्याचा अधिकार द्यावा असे मीलचे मत आहे. तसेच श्रीमंत व्यक्तींनाही अधिक मतांचा अधिकार असावा. यामुळे चांगल्या शासनाची निर्मिती होईल. असे मीलचे मत आहे.

(4) स्त्रीयांना मताधिकार :- मीलच्या मते पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही मतदानाचा अधिकार असावा लिंगभेदाच्या आधारावर त्यांना राजकारणापासून दूर ठेवू नये. स्त्री-पुरुषांना समान दर्जा मिळावा. स्त्रीयांना मतदानाचा अधिकार नाकारणे म्हणजे जवळपास अर्ध्या लोकसंख्येला राजकीय कार्यात भाग घेण्यापासून वंचित करणे होय. असे मीलचे मत आहे.

(5) खुले मतदान :- गुप्त मतदान पद्धतीला विरोध करून मिलने खुल्या मतदान पद्धतीचे समर्थन केले आहे. मतदानाचा अधिकार पवित्र व नैतिक असल्यामुळे त्याचा उपयोग सद्सद्विवेक बुद्धीने करावा. पवित्र व नैतिक कार्य करण्यामध्ये गुप्तता राखण्याचे काहीच कारण नाही गुप्त मतदान पद्धतीमुळे व्यक्ती काहीतरी अनैतिक कार्य करीत आहे असा भास होतो. कारण अयोग्य आणि अनैतिक कार्यच गुप्तपणे केली जातात म्हणूनच मीलने खुल्या मतदानाचा पुरस्कार केला आहे.

(6) प्रशिक्षित सदस्य / प्रतिनिधी :- मीलच्या मते कायदेमंडळाचे सदस्य हे प्रशिक्षित असावेत. सदस्यांनी केवळ जनतेचे प्रतिनिधित्व करू नये, तर त्यांना मार्गदर्शन आणि त्यांचे नेतृत्व करावे. तो सभ्य, सुसंस्कृत, शिक्षित असावा

(7) सदस्यांना वेतन असू नये :- मीलच्या मते संसद सदस्यांना कोणत्याही प्रकारचे

Scanned with CamScanner

वेतन असू नये. त्यांना वेतन दिले तर तो धंदेवा-
धंदेवाईक राजकारणी बनतील. तसेच त्यांच्या-
वर कोणत्याही प्रकारचा आर्थिक दबाव पड-
ता कामा नये. निवडणुकीसाठी जो काही खर्च
होईल तो राज्यातर्फे करण्यात यावा. असे
मीलचे मत आहे.

(8) द्विगृही संसद :– संसदेवरील कामाचा ताण
कमी करण्यासाठी, चांगले कायदे निर्मा-
ण करण्यासाठी, संसदेच्या हुकूमशाही प्रवृत्ती-
वर अंकुश ठेवण्यासाठी मीलने द्विगृही संस-
देचे समर्थन केले आहे.

(9) संसदेचे कार्य :– मीलच्या मते संसदेचे
प्रमुख कार्य म्हणजे (1) सरकारचे निरीक्षण
व नियंत्रण करण्याचे आहे. (2) कायदा निर्मितीचे
कार्य एका विशिष्ट आयोगाद्वारे करण्यात यावे.
(3) आयोगाने तयार केलेल्या कायद्याला संस-
देनी मान्यता द्यावी. (4) आयोगाने तयार
केलेल्या कायद्याला नाकारण्याचा अधिकार
संसद सदस्यांना असावा (5) प्रशासनाचे कार्य-
कुठल्या संसद सदस्यांनी करू नये (6) प्रशास-
कीय कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवावे.

थोडक्यात संसदेचे कार्य म्हणजे
चर्चा करणे, विचारविनिमय करणे आणि
जनतेशी संसदेच्या कार्याची सांगड घालणे.
ही कार्य संसदेनी करावीत असे मीलचे
मत आहे.

अशाप्रकारे मिलनी वरीलप्रमाणे प्रतिनिधीक लोकशाहीचा विचार मांडला असला तरी त्याच्या या विचारात खालील दोष दिसून येतात.

1) मर्यादित मतदान
2) अनुभवांची उपेक्षा
3) खुले मतदान असमर्थनीय
4) हेअरचा विचार अव्यवहार्य
5) अशिक्षितांना मतदानापासून वंचित ठेवणे चुकीचे
6) असमानता इ.

इ. दोषही त्यांच्या विचारांमध्ये दिसून येतात

Scanned with CamScanner